


# दरवळे सुगंध अत्तरांचा

सध्या वातावरणात दिवाळीचा उत्साह आहे. बच्चे कंपनीकरता फटाके, घरी फराळासाठी किराणा माल, कुटुंबाकरिता नवीन कपडे यांच्या खरेदीची लगबग सुरु आहे. पण आठवणीने लक्ष्मी पूजनाकरता अत्तराची खरेदी होते. या अत्तराची आज आपण माहिती घेणार आहोत.

ह्या जगात क्वचितच अशी व्यक्ती असेल कि ज्याने अत्तर लावले नसेल. सुवासिकपणा हे अत्तराचे खास वैशीष्ट आहे. त्याची भुरळ भल्याभल्यांना पडली आहे. अशा या अत्तराची माहिती आपण ह्या लेखात घेणार आहोत.

अत्तर हा शब्द पारशी इतिर या शब्दापासून आला आहे असा अर्थ आहे इत्र, ज्याचा अर्थ हा सुगंधी द्रव्य असा होतो.

अत्तर किंवा ओत्रा हा एक अरबी शब्द आहे ज्याचा अर्थ सुगंध आहे. असेही मानले जाते की अत्तर हा मूळचा पर्शियन शब्द आहे ज्याचा अर्थ सुगंध आहे.

**परफ्यूमचा इतिहास**

प्राचीन काळी, त्यावेळच्या पूजाअर्चनेच्यावेळी, काही खास वनस्पती किंवा काही खास झाडांच्या खोडाच्या साली जाळून सुवासिक धूर केला जायचा. रोमन संस्कृतीत (ख्रिस्तपूर्व) पॅगन लोक देवाची पूजाअर्चना करताना हा सुवासिक धूर वापरीत. त्यांच्या मते देवाकडे जाण्याचा मार्ग ह्या 'धूरा पासून' सुरू होतो. लॅटिन भाषेत 'per fumum' म्हणजे 'धूरा पासून' किंवा इंग्रजीत 'from smoke'. त्याचेच पुढे काळाच्या ओघातले आधुनिक रूप म्हणजे ह्या सुगंधाला आजचे पडलेले नाव, परफ्यूम. त्यामुळे आजच्या काळात वापरला जाणारा 'परफ्यूम' हा शब्द आलेला आहे. परफ्यूमच्या सुवासिक इतिहासात डोकावले असता, परफ्यूमचा वापर हा इसवीसनाच्या ४००० वर्षांपूर्वीपासून असल्याचे ह्या विषयातील संशोधक आणि जाणकारांचे मत आहे. ह्या ऐतिहासिक खोलात जर जायचा प्रयत्न केला तर तो इतिहास आपल्याला पार इजिप्त पर्यंत घेऊन जातो. मध्य पूर्वेत इजिप्त

जवळ उत्खननात इसवीसनाच्या ४००० वर्षांपूर्वीच्या काही कबरींचा शोध लागला आणि त्या कबरींमध्ये काही कुप्या मिळाल्या. त्या कुप्या ह्या सुगंधी द्रव्यांच्या असल्याचे निदर्शनास आले. त्यावरून इजिप्तमध्ये त्या काळाच्या संस्कृतीत सुगंधी द्रव्यांचा फार वापर केला जात होता ह्याचा शोध लागला. पण त्या कबरींमध्ये ह्या कुप्या काय करीत होत्या? तर त्या रहस्याची पुराण वस्तुशास्त्रज्ञांनी केलेली उकल अशी की मृतात्म्याचा स्वर्गात जातानाचा प्रवास हा सुवासिक असावा अशी त्या काळी धारणा होती. आहे की नाही हा परफ्यूमच्या इतिहास त्याच्या नावाप्रमाणेच एकदम आल्हाददायक.

हिंदू, बौद्ध आणि शीख धर्मातील पूजा, भोजन आणि ध्यानातही सुगंधी द्रव्ये वापरली जातात.

भारतीय परंपरेत प्रार्थना, पूजा, हवन अशा सर्वकाम्य वा आध्यात्मिक प्रक्रियांच्या सुरवातीला धूप–दीपस्थापन करण्याची पद्धत आहे. यावेळी म्हणण्यात येणारा श्लोक असा,

*वनस्पति रसोद्भूतोगन्धाढ्यो गन्धः उत्तमः।*
*आघ्रेय सर्व देवानां धूपोऽयं प्रतिगृह्यताम॥*

वनस्पतीच्या रसापासून उत्पन्न झालेला, सर्व सुगंधी पदार्थांत श्रेष्ठ, उत्तम सुगंध असणारा व सर्व देवांना आवश्यक असणारी शक्ती पोचविणारा हा धूप देवांनी स्वीकारावा (वनस्पती किंवा धातू हे स्थूल स्वरूप, गंध वा अत्तर हे सूक्ष्म स्वरूप आणि त्यांचा सुगंध किंवा सुगंधित धूप–धूर हे अति अति सूक्ष्म वायवीय स्वरूप).

दक्षिण आशियाई अत्तराचा इतिहास सभ्यते इतकाच जुना आहे. पुरातत्वीय पुरावे असे सूचित करतात की भारतीय व्दीपकल्पात राहणाऱ्या लोकांना सुगंधी वनस्पतींचे ज्ञान होते. कालांतराने, त्यांनी हळूहळू वनस्पतींना दाबून, कुस्करून आणि उर्ध्वपातन करून आवश्यक तेले तयार करण्याची कला शोधून काढली. नंतरच्या काळात लोकांनी प्राण्यांच्या अवयवांपासून आवश्यक तेले तयार करण्याची कला विकसित केली.

सहाव्या शतकात वराह मिहिराने (505 AD - 587 AD) लिहिलेल्या बृहत संहिता या संस्कृत भाषेतील ज्ञानकोशात अत्तरांचा प्रामुख्याने उल्लेख आहे. त्या काळात, सौंदर्य प्रसाधने आणि सुगंधी द्रव्ये मुख्यतः पूजा, विक्री आणि लैंगिक संबधातील आनंदासाठी वापरली जात होती.

बृहत संहितेतील एक संपूर्ण अध्याय अत्तरांना समर्पित आहे. गंध युक्ती असे या अध्यायाचे नाव असून त्यामध्ये अत्तर तयार करण्याची पद्धत व घटक यांचे तपशीलवार वर्णन केले आहे. गंध युक्तीमध्ये आठ पदार्थांपासून अत्तर तयार करण्याचा उल्लेख आहे. या पदार्थांमध्ये रौध्रा, उसिरा, बिग्नोनिया, अगुरु, मुस्ता, वान, प्रियंगू आणि पथ्या या नावांचा समावेश आहे. माउथवॉश, आंघोळीची पावडर (उटणे), अगरबत्ती आणि टॅल्कम पावडरसाठी सुगंध तयार करण्याच्या पद्धतीचा उल्लेखही गंधयुक्तीने केला आहे.

भारतात अत्तर तयार करण्याची परंपरा हजारो वर्ष जुनी आहे. अत्तराचा सर्वात नवीन आणि लोकप्रिय शोध म्हटला तर ते गुलाबजल आहे, ज्याचा वापर मुघल सम्राट जहांगीरच्या बेगम नूरजहाँने केला होता.

ऊर्ध्वपातन पद्धतीने अत्तर तयार करण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख आयुर्वेदातील प्रसिद्ध ग्रंथ चरक संहितेत आहे.त्याच बरोबर उत्तर भारतात सातव्या शतकात लिहिलेल्या हर्षचरितातही आगर लाकडापासून तयार केलेल्या सुगंधी तेलाचा उल्लेख आहे.

प्राचीन भारतात सुगंधी फुले आणि वनस्पती पाण्यात किंवा तेलात भिजवून तयार केले जात असे. त्यामुळे हळूहळू झाडे पाण्यात किंवा तेलात सुगंध सोडत असत. नंतर अत्तरमधून वनस्पती किंवा फुले काढली गेली. हे अत्तर फक्त राजघराण्यातील लोक किंवा महत्त्वाच्या व्यक्ती वापरत असत.

**वापर आणि प्रकार :**

अत्तराचे वर्गीकरण सामान्यत: शरीरावर असलेल्या त्यांच्या प्रभावाच्या आधारित केले जाते. कस्तुरी, अंबर आणि केसर (केशर) सारखे उबदार अत्तरांचा वापर हिवाळ्यामध्ये केला जातो, कारण असे मानले जाते की ते शरीराचे तापमान वाढवण्यास पोषक असतात. तसेच, गुलाब, चमेली, खस, केवडा आणि मोगरा सारख्या थंड अत्तरांचा उपयोग उन्हाळ्यात केला जातो.

जरी अत्तर बहुतेकदा त्यांच्या सुगंधीपणासाठी वापरले जातात, तसेच ते औषधी आणि कामोत्तेजक हेतूंसाठी देखील वापरले जातात. साधारणपणे एका कापसाच्या लहान भागावर अत्तर घेतात व तो कापूस कानातल्या पाळीत ठेवतात. कारण तेथोलनसही अत्यंत पातळ असते. ह्याला मराठीत फाया म्हणतात. भारतातील अस्सल गुलाब, हिना, वाळा यांसारखी लोकप्रिय अत्तरे सोडली तर बहुतेक सुगंध एका अर्थी कृत्रिम सुगंधाच्याच वर्गात येतील. अत्तर ही ताजी फुले व इतर सुगंधी मालापासून तयार केली जातात.

**अत्तराची राजधानी कन्नोज :**

कन्नोज एक उत्तर प्रदेशातील लहानसे शहर. या शहराचा उल्लेख केला नाहीतर अत्तराचा इतिहास अपूर्णच आहे. त्याची कीर्ती गेली हजारोवर्षे अत्तरासाठी जगप्रसिद्ध आहे. उत्तर प्रदेशातील कन्नोज हे अत्तरनिर्मितीचं केंद्र समजलं जातं. कन्नोज बाबत असं म्हटलं जातं की, येथील सांडपाण्यालासुद्धा सुगंध येत असतो.



भारतीय सुगंधकारांनी बाष्परूपातून सुगंधी घटक प्रामुख्याने चंदनाच्या तेलावर शोषून घेण्याची ही कला विकसित केली.अशा तेलावर काढलेल्या उत्पादनांना ‘अत्तर’ असं संबोधण्यात येतं. अत्तरे ही बकुळ, हिना, गुलाब, मोगरा, चाफा, निशिगंध, केवडा, पारिजातक, वाळा अशी अनेक प्रकारची असतात व ती नैसर्गिक असा मूळचाच सुगंध देतात. म्हणून उत्तर प्रदेशातील कन्नोज हे अत्तर निर्मितीचं केंद्र मानलं जातं आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अत्तरे व तत्सम उत्पादनांत त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

पाश्चात्त्य देशांत सुगंधासाठी द्रावक म्हणून अल्कोहोल वापरला जातो.म्हणूनच मुस्लीम समाज पाश्चात्त्य सुगंध वापरीत नाहीत. इस्लाममध्ये मादक पदार्थाचे सेवन व बाह्य़ उपयोगासाठी वापर निषिद्ध आहे. इस्लामच्या या शिकवणुकीचा कन्नोजच्या अत्तर निर्मिती उद्योगाला अप्रत्यक्षरीत्या फायदाच झाला आहे.

अत्तर निर्मिती करताना सुगंधी मालातील सुगंधी घटक बाष्परूपाने प्रामुख्याने चंदनाच्या तेलावर शोषून घेतले जातात व तयार झालेली अत्तरे मूळ स्वरूपातच वापरली जातात. येथून मोठय़ा प्रमाणावर अत्तराची निर्यात सौदी अरेबिया व इतर मुस्लीम देशांत केली जाते. हाज यात्रेच्या वेळी तर येथील निर्यात कळसाला पोहोचलेली असते. लाखो हाज यात्रेकरू मक्का आणि मदिना येथून स्वत:साठी तसेच आप्तस्वकीय व मित्रमंडळींना भेट देण्यासाठी अत्तराची खरेदी करतात.

अत्तर निर्मितीचा उद्योग भारतात शेकडो वर्षे चालू आहे. पुरातत्त्व खात्यातर्फे कन्नोजमध्ये उत्खनन करताना आजच्या काळात कन्नोजमध्ये अत्तर निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांसारखीच शेकडो वर्षांपूर्वीची उपकरणे सापडली आहेत. त्या काळीसुद्धा भारतातून इराणमध्ये, तेथून युरोपमध्ये अशी

व्यापारी देवघेव होत असे.

मोगलांच्या अत्तरावरील प्रेमामुळे हा उद्योग भारतात सर्वत्र झपाटय़ाने वाढू लागला.मोगलांनीच अजून एका प्रकारे या उद्योगाला हातभार लावला.मोगल सम्राट, त्यांचे कुटुंबीय, मोगल दरबारातील सरदार या सर्वांना विविध सुगंधी फुलांचे, सुगंधी वनस्पतींचे आकर्षण होते. त्यामुळे त्यांनी विविध सुगंधी फुलझाडे व सुगंधी वनस्पतींच्या अनेक नव्या जाती मध्य आशियातून भारतात आणल्या. मोगलांच्या काळातच भारत हा एक महत्त्वाची आर्थिक सत्ता झाला होता व भारताचा जगातील विविध देशांशी व्यापार वाढीस लागला होता.त्या व्यापारात 'अत्तर' हा एक प्रमुख घटक होताच. दक्षिण भारतातसुद्धा अत्तर निर्मितीची छोटी-छोटी केंद्रे आहेत, पण अत्तर उद्योगाच्या चाव्या कन्नोजकडेच राहिल्या. कारण एकतर ते त्या वेळच्या विविध राजधान्यांपासून जवळ होते आणि दुसरे म्हणजे कन्नोजवर असलेला निसर्गाचा वरदहस्त! तेथील हवा व सुपीक जमीन ही विविध जातींच्या सुगंधी फुलझाडांना व सुगंधी वनस्पतींना पोषक आहे. त्यात पाणी मुबलक; परंतु तेथील वातावरण सर्वच वनस्पतींना पोषक नाही. तेथे न होणाऱ्या वनस्पती बाहेरून मागविल्या जातात. केवडा हा ओरिसामधून मागविला जातो, तर चंदनाचे तेल प्रामुख्याने दक्षिण भारतातून आणले जाते.

अत्तर हे सुगंधासाठी शरीरावर तसेच कपडय़ावर लावले जातेच, पण त्याचा सुगंध जसे वासाचे सुख देतात, तसाच ते मनावर आणि शरीरावर इष्ट परिणाम घडवून रोगनिवारणालाही मदत करतात. अस्सल गुलाब पाण्याला तर औषधी गुणधर्मामुळे खूपच मागणी असते. ते मुख्यतः डोळ्यांचे विकार तसेच जखमा धुण्यासाठी वापरले जाते. गुलाब पाणी, केवडा पाणी हे खाद्य पदार्थातदेखील वापरले जाते. खासकरून मिठाईत, पण कन्नोजच्या उत्पादनांचे सर्वात मोठे ग्राहक तंबाखू व पान-मसाल्याचे उत्पादक हे आहेत. अत्तर ही सिगारेटला सुगंध देतेच, त्याचबरोबर गुटख्यालासुद्धा देते.म्हणूनच कन्नोजमधील अत्तर निर्मिती केंद्रे रात्रभर चालू असतात. फुलांपासून अत्तर काढण्याची प्रक्रिया १०-१२ तासांत होत असली तरी कर्पूर काचरी, जटामांसी, वाळा, सुगंध कोकिळा, नागरमोथा इत्यादी विविध प्रकारच्या जडीबुटींपासून अत्तरनिर्मिती करण्याची प्रक्रिया मात्र तीन ते पाच दिवस चालते. काही अत्तरे तर ३०-४० विविध प्रकारच्या जडीबुटींपासून तयार केली जातात.अशा तयार केलेल्या अत्तरांची किंमत त्याच्या दर्जाप्रमाणे दोन हजार रुपयांपासून १२ लाख रुपये किलोपर्यंत असते.

चंदनाच्या तेलाची किंमत प्रतिकिलो ७० हजार रुपयांच्या जवळपास पोहोचली आहे.दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या चंदनाच्या तेलाच्या किमतीमुळे अत्तरांची किंमतसुद्धा वाढतच चालली आहे. चंदनाच्या व्यापारावर पूर्णपणे सरकारचे नियंत्रण आहे,

तर रासायनिक घटकद्रव्यांपासून बनविलेल्या कृत्रिम सुगंधांची किंमत ५०० रुपयांपासून १० हजार रुपये प्रतिकिलो पडते. पाण्यात विद्राव्य असे गुलाबाचे व केवडय़ाचे सुगंध योग्य त्या प्रमाणात घालून कृत्रिम 'गुलाब जल' किंवा 'केवडा जल' तयार केले जाते.

### परफ्यूमच्या सुगंधाचे प्रकार कोणते?

ह्या परफ्यूमचे सध्याच्या आधुनिक काळात वर्गीकरण साधारण पाच ढोबळ प्रकारात केले जाते.

फ्लोरल नोट्स: गुलाब, जाई, चमेली, कार्नेशन इत्यादी विविध फुलांपासून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

ओरिएंटल नोट्स: प्राण्यांच्या सुवासिक अवयवांपासून मिळवलेल्या सुगंधी तेलांना फळांच्या आणि फुलांच्या सुगंधी तेलांबरोबर मिसळून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

वुड नोट्स: चंदन, देवनार यांसारख्या झाडांच्या

खोडापासून मिळवलेल्या सुगंधी तेलांपासून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

**फ्रेश नोट्स:** सायट्रस (लिंबू, संत्री, मोसंबी) चवीच्या फळं आणि फुले यांपासून मिळवलेल्या सुगंधी तेलांपासून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

**Fougère नोट्स:** फ्रेंच भाषेत Fern (नेचे सदृश वनस्पती) ला Fougère म्हणतात. ह्या नेचे सदृश वनस्पतींपासून मिळवलेल्या सुगंधी तेलांपासून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

हे ढोबळ आणि मूलभूत वर्गीकरण झाले, ह्यांच्या उपप्रकारांत असंख्य प्रकारचे फ्लेवर्स असलेली परफ्यूम्स बाजारात उपलब्ध आहेत.

**परफ्यूम कसे वापराल?**

परफ्यूम फवारल्यावर त्यातले सुगंधी कण हळूहळू उडून जातात. ते उडून जाताना त्यांच्या नोट्स प्रमाणे गंध दरवळत राहतो. जास्त काळ ह्या परफ्यूमचा गंध दरवळत ठेवायचा असेल तर ते परफ्यूम कसे वापरायचा ह्याचे ज्ञान असणे गरजेचे आहे. सर्वात आधी तुमच्या आवडीचा परफ्यूम निवडून घ्या. बरेच परफ्यूम्स वापरल्यानंतर तुम्हाला नेमका शोभणारा (सूट होणारा) परफ्यूम ठरवता येईल. आता परफ्यूम निवडून झाला असेल तर मग तो लावण्यापूर्वी छानपैकी अंघोळ करून घ्या. तुमच्या परफ्यूमच्या सुगंधाच्या जवळ जाणारा सुगंध असलेल्या साबणाने अंघोळ केल्यास उत्तम.

आता हा परफ्यूम चोपडण्याच्या काही विशेष जागा आहेत तेथे तो लावल्यास त्याचा परिणाम फार काळ टिकून राहतो. आपल्या शरीरावर जिथे नाडीचे ठोके जाणवतात त्या जागा हा परफ्यूम फवारण्यास अती उत्तम म्हणजे हाताचे मनगट, हाताच्या कोपराची आतली बाजू, छाती शिवाय मान आणि कानाच्या पाळीच्या मागची बाजू ह्या जागा तर खास महत्त्वाच्या. साधारण जिथे जिथे हे परफ्यूम फवारले आहे ती जागा अंगावरच्या कपड्यांनी झाकली जाईल अशी काळजी घेतल्यास त्या परफ्यूमचा परिणाम जास्त काळ राहू शकतो. परफ्यूममधले उडून जाणारे सुगंधी कण कपड्यामुळे हवेत विरून जायला वेळ लागतो आणि त्याचा परिणाम जास्त काळ टिकतो.



अत्तर हे खूप तिव्र सुंगधी असते. यामुळेच त्यांची विक्री अगदी लहान काचेच्या कुपीमध्ये केली जाते. या कुपी देखील अतिशय सुंदर डिझाइन केलेल्या असतात आणि बहुतेक काचेच्या असतात. अत्तर इतके तीव्र आहे की एक छोटीशी कुपीही कांहीमहिने नाही तर कांही वर्षे वापरता येते. नैसर्गिक तेलाची शुद्धता आणि स्वभाव यामुळे अत्तर खराब होण्याची शक्यता खूपच कमी असते.पण जर अत्तराचे शुद्ध सार ते पातळ करण्यासाठी वनस्पती तेलात मिसळले तर ते लवकर खराब होण्याची शक्यता असते. परंपरेनुसार, जगभरातील अतिथींना त्यांच्या जाण्याच्या वेळी किंवा ईदच्या निमित्ताने अत्तर भेट देण्याची परंपरा आहे. अत्तर पारंपारिकपणे सजावटीच्या आणि सुंदर काचेच्या बाटल्यांमध्ये सादर केले जातात. या सुंदर बाटल्यांना इट्रादान म्हणतात. अतिथींना भेटवस्तू म्हणून अत्तर देण्याची परंपरा पूर्वेकडील जगाच्या अनेक भागांमध्ये आजही चालू आहे.

**सेलिब्रिटींचे आवडते अत्तर :**

आधुनिक भारतात, मुघल सम्राटांचे नाव अत्तरच्या सर्वात मोठ्या प्रेमींमध्ये येते. हैदराबादच्या निजामांना चमेली

किंवा चमेलीचा अत्तर खूप आवडायचा. केवळ राजे–राज्येच नव्हे, तर कवींनाही अत्तराच्या सुगंधाचे वेड होते.




सद्धयाच्या काळात अत्तराचा वापर नव श्रीमंत, हिंदी नट व नट्या विशेष करून करतात.

**अत्तराचा उपयोग :**

पूर्वी दक्षिण आशियामध्ये बनवलेले अत्तर फक्त राजे आणि राण्या किंवा खास आणि निवडक लोक वापरायचे. हिंदू मंदिरांमध्येही याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. सध्याच्या जीवनशैलीमध्ये आणि एकूणच बघितले तर, आज अत्तराचा वापर अनेक प्रकारे केला जातो. उदाहरणार्थ,

१. अत्तराचा वापर अनेक लोक परफ्यूम सारखा पण करतात. मुस्लिम समाजातही अत्तर खूप लोकप्रिय आहे. कारण अत्तरात दारूचा वापर केलेला नसतो.

२. औषधी उद्योगातही अत्तराचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

३. पारंपारिक लखनवी, हैदराबादी, पाकिस्तानी, भारतीय, बंगाली मिठाईमध्ये चव वाढवण्यासाठी

गुलाब आणि केवडा सारख्या अत्तराचा वापर केला जातो.

४. तंबाखू, पान मसाला आणि गुटखा बनवण्यासाठीही अत्तराचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.

पान मसाला आणि गुटख्यामध्ये गुलाब, केवडा, मेंदी, हिना, शमामा, माती आणि झेंडूचे अत्तर वापरले जाते.

५. पान खाण्याचे शौकीन जगभर आहेत. पान बनवताना देखील मुख्यतः केवडा आणि गुलाबाच्या सुगंधाचा वापर केला जातो.

६. आयुर्वेदात सुगंध हा मनावर उपचार करण्याचे एक माध्यम म्हणून सांगितलेले आहे. यासाठी अत्तर१००% शुद्धच हवे.

**किती दिवस साठवून ठेवू शकतो ?**

शुद्ध अत्तर कधीही खराब होत नाही. असे काही अत्तरं आहेत की, ते जेवढी जूनी होतात तेवढा त्यांचा सुगंध वाढतच जातो. अत्तर खराब होण्यापासून वाचवण्यासाठी ते ॲल्युमिनियमपासून बनवलेल्या अत्तरदानीमध्ये ठेवले जाते.तसे, अत्तर पारंपारिकरित्या उंटाच्या कातडीपासून बनवलेल्या कुपी(शिशी) किंवा बाटलीमध्ये ठेवले जाते. उंटाच्या कातडीपासून बनवलेल्या कुपीमधील अत्तर कधीच खराब होत नाही.

**अत्तर लावण्याची पद्धत :**

अत्तर खुप घट्ट असते, त्यामुळे चांगल्या अत्तराचा सुगंध बरेच दिवस टिकतो. तसेच अत्तर लावताना हा देखील सल्ला दिला जातो की, अत्तर लावण्यापूर्वी तळहाताच्या मागील बाजूस ते थोडेसे लावावे आणि दुसऱ्या हाताच्या पाठीमागे घासून घ्यावे. याच्या मदतीने तुम्ही त्याचा सुंदर सुगंध अनुभवू शकाल.

परफ्यूम/अत्तर दीर्घ काळापर्यंत ताजे ठेवण्याची एक

पद्धत म्हणजे, अत्तराची कुपी लपवून ठेवली पाहिजे.तुम्ही हे हसण्यावारी न्याल, पण हे खरं आहे.अंधाऱ्या आणि कोरड्या जागा सुगंध साठवण्यासाठी सर्वात उत्तम असतात. अत्तराची नविन बाटली साठवण्यासाठी एखाद्या अलमारीचा आतला कोपरा सर्वात चांगली जागा मानली जाते.

पण नव्या अत्तराचा/ परफ्यूमचा सुगंध असा किती दिवस टिकणार? हा खरेतर मोठा प्रश्न आहे. परफ्यूम फक्त सौम्य होत नाही, तर त्यांचा सुगंधही हरवतो. एवढेच नाही, एका विशिष्ट काळानंतर त्यांचा रंग तर उडतोच, शिवाय सुगंधही कमी व्हायला लागतो.

भारतात किंबहुना जगात अत्तराचा व्यापार हा बहुतांशी बोहरी समाजाकडे आहे. परंतु अलीकडच्या काळात कांही तरुण मुलांनी अत्तर बनवण्याचे शात्रोक्त शिक्षण घेऊन स्वतःचे असे स्थान बनवून ह्या व्यापारात बस्तान बसवले आहे.

**औषधी गुणधर्म :**

१. विशिष्ट सुगंधामुळे छाती भरून श्वास घेण्याची प्रवृत्ती वाढल्याने रोग परिहाराला सुरवात होते. वनस्पतीत असणारे औषधी गुणधर्म हे त्यांचे अत्यंत सूक्ष्म कण सुगंध मार्गाने शरीरात प्रवेश करत असल्याने त्याचा औषध म्हणूनही उपयोग होतो.

२. औषध योजनेत फुलांचा समावेश करता येतो. एक गोष्टमात्र खरी, की ही एक पूरक उपचार पद्धती असून, ती काही मर्यादेतच वापरता येते. त्याचे अति स्तोम करून नुसत्या सुगंध उपचार पद्धतीवर अवलंबून राहण्याने रोग बळावून तोटा होऊ शकतो.

३. पाण्यामध्ये अत्तराचे दोन थेंब टाकून पाणी गरम केल्यास अत्तराचे पार्थिव कण अतिसूक्ष्म कणांच्या रूपात वातावरणात पसरतात हाही अनुभव आपल्याला असतो.

४. नैसर्गिक कस्तुरी व इतर सुगंधी द्रव्यांची अत्तरे मिष्टान्नात मिसळली जाते.

५. व्यक्तीची नैराश्य अवस्था (DEPRESSION) कमी करते.

६. बऱ्याचशा अत्तराचे प्रकार कामोत्तेजक म्हणून वापरले जातात.

एक गोष्ट निश्चित आहे, की घरात वा विशेष प्रसंग असताना फुलदाणीत चार फुले ठेवून वातावरण आनंदी करण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करत असतो. याचाच अर्थ फुलांमुळे मानसिक नैराश्य दूर होते.

सुगंध निर्मिती म्हणजे अत्तर निर्मिती अशी अनेकांची समजूत असते. सध्या तरुणाई जे सेंट म्हणून अत्तर लावतात ते मूळ अत्तर नव्हे. ते अल्कोहोलमध्ये कृत्रिम पद्धतीने बनवलेले सुवास टाकून किंवा ॲरोमॅटिक ऑरगॅनिक केमिकल्स एकत्र मिसळून तयार केलेले सुवास असतात. जसे की ब्रुटस, वॅनिला, कॅरॅमल, निलगिरी, कापूरइत्यादी. ही कृत्रिम अत्तरे विशिष्ट फ्लॅवोनाईडस वापरून बनवली जातात व मूळ अत्तरापेक्षा खूप स्वस्त असतात. त्यामुळे त्यांचा खप बराच मोठा आहे.

हे कृत्रिम सुगंध वेगवेगळी अर्कमय तेले व रासायनिक सुगंधी द्रव्ये वापरून तयार केलेले असतात. यांना ‘सुगंधी मिश्रणे’ (ब्लेण्ड्स) किंवा ‘औद्योगिक सुगंध’ (इंडस्ट्रियल परफ्युम्स) म्हणणे योग्य ठरेल. जसे कि यूडीकोलोन. या कृत्रिम अत्तरांच्या वाढत्या वापरामुळे कन्नौजमधील अत्तर उद्योगावर संक्रांत आली आहे. अत्तरांचा हा जुना नैसर्गिक सुगंध काळाच्या उदरात हरवू जाण्याची भीती आहे.

चला तर मग, ह्या वर्षीची दीपावली तुमच्यासाठी अतिशय सुगंधी आणि सुवासिक अशी असो, ही शुभेच्छा व्यक्त करत ही परफ्यूमची गाथा इथे सुफळ संपूर्ण करतो.

◆

**डॉ. दिलीप कुलकर्णी**
मोबा. ९८८१२०४९०४